# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१७/०६/२०१६.

**१) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :–**

**अ)** दिनांक १६/०६/०१६ रोजी १७.५० ते १८.०० वा. दरम्यान आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटार सायलक क्र. १९ बि.सी. २०१२ ही दारू पिवुन दारूच्या नशेत कारधा टोल नाका येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आले. असे सर तर्फे फिर्यादि पोहवा. हटवार, वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोना. राठौड पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १६/०६/०१६ रोजी १९.५० ते २०.१५ वा. दरम्यान आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटार सायलक क्र. ३६ टी ६७०६ ही दारू पिवुन दारूच्या नशेत गिरोला येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आले. असे सर तर्फे फिर्यादि पोहवा. बडवाईक, वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोना. टेंभुर्णे पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) अचानक प्रकृती बिघल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक ०५/०६/०१६ रोजी १०.४२ वा. किशोर जगतराम रहांगडाले, वय ४८ वर्ष रा. गररा/बघेडा याची अचानक प्रकृती बिघडल्याने त्याला औषधोपचारा करीता सामान्य रूग्णालय भंडारा येथे भरती केले होते. तेव्हा उपचारा दरम्यान तो मरण पावला. असे डॉ. मेमो वरून पोस्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००१६ क.१७४ जाफौ चे कागदपत्र पो.स्टे. ला प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी सफौ. मोदनकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) गळफासाने इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक १६/०६/०१६ रोजी १७.०० वा. दरम्यान आनंदराव किसन बगमारे, वय ३५ वर्ष रा. भागडी हा दारू पिण्याच्या सवईचा असुन तो नेहमी दारू पित होता. तो अविवाहीत असुन आई सोबत राहत होता. आनंद किसन बगमारे याने चिचोली शेतशिवारात असलेल्या शेतातील करंजीच्या झाडाला स्वत:च्या दुप्पटयाने गळफास लावुन मरण पावला. असे फिर्यादी बाबुराव किसन बगमारे, वय ४८ वर्ष रा. भागडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोउपनि. बंडीवार पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४) टाटा इंडिका गाडीची मोटार सायकलला धडक, दोन जखमी. :–**

दिनांक १०/०६/०१६ रोजी १८.०० वा. दरम्यान फिर्यादी विठोबा गणपत साठे, वय ७४ वर्ष रा. पंचशिल वार्ड साकोली यांचा मुलगा व नातीन हे त्यांच्या मोटार सायकल क्र एम.एच. ३६ पी ४०६० ने एन एच ६ रोड क्रॉस करीत असतांना आरोपी टाटा इंडीका गाडीच्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन नागपुर कडे जात असतांना भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन एनएच. ०६ रोड कटकवार चौक येथे मोटार सायकलला उजव्या बाजुस धडक मारून मोटार सायकलवर बसलेल्या दोन्ही इसमांना जखमी करून वाहन सोडुन पळुन गेले. असे फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादंवि सहकलम १३४,१८४ अ,ब मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १६/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०३ केसस, तिन सिटर वाहनांवरती १२ केसेस व इतर वाहनांवरती ११३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

O/C
17/6/16

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.